जा.क्र.प्रावि-१/२००१-२००२/ ३७९८/०६
विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
दिनांक : १०.९.२००१ 13 SEP 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद,
जालना.

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र. व्हीएलएस-१०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दि. १९.७.२००१

वरील विषयी संदर्भीय पत्र या कार्यालयास उद्देशुन लिहिलेले व आपणांस पृष्ठांकित केलेले पत्र पहावे. सन २०००/२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळविण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेवून सोबत जोडलेल्या यादीतील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इ.१ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यांत येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थांना तात्काळ कळविण्यांत यावा.

२/- सदर परवानगी पत्र क्र. व्हीएलएस/१०००/(५७७/२०००)/(१)/प्राशि-३, दि. १६.९.२००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | मत्सोदरी शिक्षण संस्था, शिरसवाडी, जि.जालना | कुंभार पिंपळगांव<br>ता.घनसावंगी जि. जालना | उर्दू |

३/- याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. तसेच शासन पत्र दिनांक १६.९.२००० मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन संदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी व त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास व शासनास तातडीने पाठवावा.

स्थळ प्रत शिक्षण उपसंचालक यांनी मान्य केली आहे.

शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

Seen 3/X

प्रतिलिपी माहितीस्तव सादर.
१) मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.
३) संबंधितास.

M. S. S. Jalna